आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ जून २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- देशाला जगातली तिसरी अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीनं शेतीचा विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचा १७ वा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा
- यंदा प्रत्यक्ष कर संकलनात भरीव वाढ
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी येत्या १२ जुलैला निवडणूक
- पंढरपूर- कराड मार्गावर भरधाव ट्रकनं उडवल्यानं सहा मजूर महिलांचा मृत्यू, एक गंभीर जखमी

  **आणि**
- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३०८ अंकांच्या वाढीसह, पहिल्यांदाच ७७ हजाराच्या वर बंद /८ सत्रात ५ हजार अंकांची वाढ

**<><><><><>**

देशाला जगातली तिसरी अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीनं शेतीचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याला आपण प्राधान्य दिल पाहिजे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी मधल्या मेहेंदीगंज इथं केलं. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता आज शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रधानमंत्र्यांनी जमा केला, यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या उपक्रमांतर्गत २० हजार कोटींहून अधिक रुपये ९ कोटी २६ लाख लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत.

३० हजार स्वयं सहायता गटांच्या महिलांना कृषी सखी प्रमाणपत्रांचं वाटप यावेळी करण्यात आलं. महिलांना नव्या अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करून

देण्यासाठी आणि ३ कोटींपेक्षा अधिक लखपती दीदी बनवण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे. कृषी सखी ही योजना सध्या १२ राज्यात सुरु असून ती सर्व राज्यात राबवण्याचं उद्दिष्ट समोर आहे. महिलांच्या सहभागाशिवाय शेतीचा विकास होणं अशक्य आहे, असं मोदी म्हणाले.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि अनेक मंत्रीही व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कार्यक्रमात सहभागी झाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रात हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा कार्यक्रम केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत झाला. देशातल्या शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी आणि भविष्यातही शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे, असं खडसे यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड--बाईट--रक्षा खडसे**

**<><><><><>**

योग आणि भरड धान्याच्या संबंधित जागरुकता निर्माण करुन लोकांचं आयुष्य सुदृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सरपंचांना केलं आहे. पंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र आणि इतर ठिकाणी योग आधारित कार्यक्रमांचं आयोजन करण्याचं आवाहन त्यांनी सरपंचांना पत्र लिहून केलं आहे.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये शेर-ए-कश्मिर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यात सहभागी होतील, अशी माहिती आयुष खात्याचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><>**

चालू आर्थिक वर्षात कालपर्यंत एकूण प्रत्यक्ष कर संकलनात २२ पूर्णांक १९ शतांश टक्के, तर निव्वळ कर संकलनात सुमारे २१ टक्क्याची घसघशीत वाढ नोंदवली गेली आहे. चालू आर्थिक वर्षात कालपर्यंत सुमारे ५ लाख १५ हजार कोटी रुपयांहून अधिक एकूण प्रत्यक्ष कर तर सुमारे ४ लाख ६२ हजार कोटी रुपयांहून अधिक निव्वळ कर गोळा झाला असल्याचं अर्थ मंत्रालयानं जाहीर केलं आहे.

**<><><><>**

संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय लेकशाही आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या दिल्लीतल्या निवासस्थानी आज झाली. या बैठकीत केंद्रीय मंत्री मनोहरलाल, धर्मेंद्र प्रधान, किरेन रिजिजू, एस. जयशंकर आणि चिराग पासवान सहभागी झाले होते.

या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी आणि लोकसभा अध्यक्षांची निवड होणार आहे. तसंच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सत्राला संबोधित करणार आहेत. लोकसभेचं अधिवेशन २४ जूनपासून, तर राज्यसभेचं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होत आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या बिहारला भेट देणार असून नालंदा विद्यापीठाच्या नव्या कॅम्पसचं उद्घाटन करणार आहेत.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठीच्या निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. विधानसभेच्या आमदारांकडून या सदस्यांची निवड होणार आहे.

या निवडणुकीची अधिसूचना २५ जून रोजी जारी होणार असून २ जुलैपर्यंत अर्ज भरता येतील. ३ जुलैला अर्जांची छाननी होईल आणि ५ जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते ४ दरम्यान मतदान होऊन त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक, अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि शेकापचे जयंत पाटील यांचा कार्यकाळ २७ जुलै रोजी पूर्ण होत असल्यानं ही निवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात, पंढरपूर- कराड मार्गावर चिकमहुद जवळ आज भरधाव ट्रकनं मजूर महिलांना उडवलं, त्यात सहा महिला जागीच ठार, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. या महिला रस्त्याच्या कडेला एसटीची वाट पाहत थांबल्या होत्या. अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे, फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांनी ट्रक चालकाला पकडून पोलिसांच्या हवाली केलं.

**<><><><><>**

देशातले दोन्ही शेअर बाजार आज विक्रमी पातळीवर बंद झाले. सेन्सेक्स पहिल्यांदाच ७७ हजारांच्या वर आणि निफ्टीही पहिल्यांदाच २३ हजार ५००

अंकांच्यावर स्थिरावला. व्यवहार सुरू झाले तेव्हापासून सेन्सेक्स ७७ हजारांच्या आणि निफ्टी २३ हजार ५०० च्या वर व्यवहार करत होते. दिवसभर बाजारात हे सातत्य कायम राहिलं आणि दिवसअखेर सेन्सेक्स ३०८ अंकांची तेजी नोंदवून ७७ हजार ३०१ अंकांवर स्थिरावला.

निफ्टी ९२ अंकांची तेजी नोंदवून २३ हजार ५५८ अंकांवर बंद झाला. मतमोजणीच्या दिवसापासून अवघ्या ८ सत्रांमध्ये सेन्सेक्सनं ५ हजारांहून अधिक अंकांची वाढ नोंदवली आहे.

**<><><><><>**

नीट २०२४ परीक्षेतल्या अनियमिततेच्या तक्रारीवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. परीक्षेतल्या त्रुटींचं निवारण करून निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायालयानं विद्यार्थ्यांबाबत चिंता व्यक्त करत राष्ट्रीय चाचणी संस्था आणि केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढची सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><>**

१८वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात मिफचा आजचा चौथा दिवसही विविध चित्रपटांचं प्रदर्शन, संबंधित विषयांवरची चर्चासत्रं आणि मार्गदर्शनसत्रं, तसंच परिसंवादांनी गाजला. भारतीय वन्यजीव माहितीपट आणि संवर्धनाचे प्रयत्न या विषयावर अल्फोन्स रॉय यांचं मार्गदर्शनसत्र आज झालं. ॲनिमेशनपटांचा प्रवास आणि तरुण आणि मध्यमवयीनांना पडलेली ॲनिमेशनपटांची भुरळ यावर मुंजल श्रॉफ आणि केतन मेहता यांनी आपापले विचार मांडले. चरित्रात्मक माहितीपट आणि चरित्रपट यांच्यातला फरक राहुल रवैल आणि

रॉबिन भट्ट यांनी उलगडून दाखवला. व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार विजेते वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू आणि द कमांडंट्स शो या चित्रपटाच्या दिग्दर्शक डॅनिएला वोल्कर यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. द कमांडंट्स शो या चित्रपटाच्या चमूने आज रेड कार्पेटवरही हजेरी लावली. विख्यात ॲनिमेटर जॉर्ज श्वित्झगेबेल यांनी ॲनिमेशनचा मास्टरक्लास घेतला. याशिवाय राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेतले, बेबेल्सबर्ग चित्रपट संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपटांचा आनंद चित्रपटप्रेमींनी लुटला.

**<><><><><>**

भारताचा बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर अर्जुन एरिगसी याने अर्मेनिया इथं सुरू असलेल्या स्टेपन अवग्यान मेमोरियल स्पर्धेतल्या आज झालेल्या सामन्यात विजय मिळवला. त्यानं रशियाचा ग्रँडमास्टर वोलोदार मुर्जिन याचा ६३ चालींमध्ये पराभव केला. या विजयामुळे अर्जुननं बुद्धिबळ मानांकन क्रमवारीत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अर्जुनचा सामना अमेरिकेच्या मॅन्युअल पेट्रोसीन याच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

वायव्य आणि पूर्व भारतामध्ये आज संध्याकाळपासून उष्णतेची तीव्र लाट कमी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. त्यामुळे उत्तर भारताला मोठ्या प्रतिक्षेनंतर उष्णतेपासून दिलासा मिळणार आहे. दिल्लीत मान्सूनपूर्व पावसाची शक्याता आहे.

दरम्यान, येत्या दोन-तीन दिवसांत पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात मुसळधार पाऊस सुरू राहील. पुढचे पाच दिवसांत दक्षिण भारतात विजांचा

कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**